पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/१३०८/२०१२
दिनांक- १६/११/२०१२

प्रति,
मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २०/११/२०१२ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २०/११/२०१२ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक-३३

दिनांक- २०.११.२०१२ वेळ- दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २०/११/२०१२ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक- १) मनपास दि.८/९/१२ रोजी अहमदाबाद मनपाच्या शिष्टमंडळाने व दि.१२/९/१२ रोजी यशदा येथे प्रशिक्षणाकामी आलेल्या मान्यवरांनी भेट दिली होती. या मान्यवरांची भोजन व्यवस्था हॉटेल सिट्रस, पिंपरी येथे करण्यात आली होती. याकामी र.रू.१९,२५४/- [र.रू. एकोणीस हजार दोनशे चोपन्न] खर्च झालेला असल्याने सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) मनपाने आय.एस.ओ.प्रमाणपत्र प्राप्त करणेकामी तयार करण्यात आलेल्या पुस्तिकेतील नमुद गुणवत्ता धोरणव उद्दीष्ट इत्यादीबाबत माहिती प्रसिध्द करणेसाठी विनीयल प्रिटींग बोर्ड व स्टिकर यांची छपाई मे.पुष्पक अँडव्हरटायझिंग यांचेकडून थेट पध्दतीने करून घेण्यात आली असल्याने त्यासाठी झालेला एकूण र.रू. १२,५१५/- [र.रू.बारा हजार पाचशे पंधरा] खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) मनपास महाराष्ट्र विधान मंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीने पुणे जिल्ह्याच्या दौ-याअंतर्गत दि.२७/९/१२ रोजी भेट दिली होती. त्यावेळी मान्यवरांच्या भोजन, चहापान, नाष्टा इ.व्यवस्थेकामी र.रू. ५७,८४७/- [र.रू.सत्तावन्न हजार आठशे सत्तेचाळीस] खर्च झालेला असून सदर खर्च थेट पध्दतीने करण्यात आला असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.१९ अन्वये, वॉर्ड क्र.२०, ९९ व १०० मध्ये ठिकठिकाणी बेंचेस, दिशादर्शक फलक व किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.एन.

सी.कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.९,३३,७०६/- [र.रू.नऊ लाख तेहतीस हजार सातशे सहा] पेक्षा २४.९९ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ५) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.१४ अन्वये, वॉर्ड क्र.२०, ९९ व १०० मध्ये उदघाटन व कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणेकामी मे.शुभम उद्योग (नि.र.रू. ९,३३,७०६/- [र.रू.नऊ लाख तेहतीस हजार सातशे सहा] पेक्षा २०.१० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ६) नो.नो.क्र.१९/२०११-१२ व १९/२०११-१२ चे शुध्दीपत्रक-१ ची जाहीरात दि टाईम्स ऑफ इंडिया व दै.महाराष्ट्र टाईम्स यांचे राज्यस्तरामध्ये प्रसिध्द केलेकामी दि टाईम्स ऑफ इंडिया यांना र.रू.२,०६,४४८/- [र.रू.दोन लाख सहा हजार चारशे आठ्ठेचाळीस] व र.रू.६८,८१६/- [र.रू.अडुसष्ट हजार आठशे सोळा] आणि दै.महाराष्ट्र टाईम्स यांना र.रू.९९,०७२/- [र.रू.नव्यान्नव हजार बहात्तर] व र.रू.३५,२००/- [र.रू.पस्तीस हजार दोनशे] अदा करावयाच्या या एकूण खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) मनपाच्या झो.नि.पू.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०११-१२ मधील अ.क्र.१ अन्वये, प्रभाग क्र.१०४ मध्ये एफ.आर.पी. वाचनालय बाकडे इत्यादी बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.एन. डी.ए.प्लास्टिक (नि.र.रू.९,३३,४९५/- [र.रू.नऊ लाख तेहतीस हजार चारशे पंच्यान्नव] पेक्षा १५ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.७,९३,४७१/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असून, एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ८) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.९० अन्वये, अ प्रभागातील रस्त्यावरील खराब झालेल्या भागाला खडीमुरुम, बी.बी.एम.करून हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.व्ही.एम.मातेरे इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू. ४६,६८,५३४/- [र.रू.शेहेचाळीस लाख अडुसष्ट हजार पाचशे चौतीस] पेक्षा २.९५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.

४७,५७,३५३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव विभाग,
क्रमांक- नस/७/कावि/१३०८/२०१२
दिनांक- १६/११/२०१२

टिप- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.